# मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद
# ई–निविदा सूचना.

जा.क्र.एन/कॅश/12513/2025
दि. 18/09/2025

मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील मुख्य व संलग्न इमारत (Main & Annexe Building) येथील उद्यान कामाकरिता विहित नमून्यामध्ये ज्यांनी सरकारी, निमसरकारी आणि इतर तत्सम संस्थांसाठी काम केलेले आहे आणि ज्यांची उद्यानें / झाडांची परिरक्षा व संरक्षण, उद्यान विद्या क्षेत्रातील पुरेशी उलाढाल/अनुभव आहे अशा शासनमान्य अनुभवी कंत्राटदारांकडून (बाहय यंत्रणेद्वारे/आउटसोर्सिंगद्वारे) खालील उद्यान कामाकरिता विहित नमून्यामध्ये दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक व आर्थिक) ई–निविदा मागविण्यात येत आहे. सदरील कामाचा तपशील खालील प्रमाणे :–

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | सदरील कामासाठी आवश्यक मनुष्यबळ | सहा. संचालक वने व उद्यान यांनी निश्चित केलेली सदरील कामाची **द्वैवार्षिक रक्कम** सर्व कर, कामगार व साहित्यासहित |
|---|---|---|---|
| 1 | मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील मुख्य व संलग्न इमारत (Main & Annexe Building) परिसरातील उद्यानांचा विकास, संगोपन व देखभाल करणे (क्षेत्रफळ 22269.92 चौ. मिटर ) (कामाचा कालावधी :– कंत्राट मिळाल्यापासून दोन वर्षांपर्यंत) | माळी – 05<br>मजूर – 17 | रु.1,51,66,714/– |

उपरोक्त ई–निविदेच्या अटी व शर्ती व अधिक माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in व www.bombayhighcourt.nic.in वर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. 0240–2993303 तसेच तांत्रिक माहितीसाठी महाटेंडर साईटचा Toll Free No.0120-4001002, 4001005, 4493395 यावर संपर्क साधावा.

सदर कामांसाठीची इतर माहिती खालील प्रमाणे :

| निविदा किंमत | बयाना ठेव [E.M.D.] | सुरक्षा ठेव [Security Deposit] | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| रु. 27000 / – (ना परतावा) | रु.2,70000 / – | स्वीकृत निविदेच्या 5% | कंत्राट मिळाल्यापासून दोन वर्षे पर्यंत. |

ई–निविदेचे वेळापत्रकः

| | | | |
|---|---|---|---|
| ई–निविदा प्रसिध्दी दिनांक | 19 / 09 / 2025 सकाळी 10.00 वा. | ई–निविदा विक्रीची शेवटची तारीख | 03 / 10 / 2025 दुपारी 3.00 वा. |
| ई–निविदा विक्रीची सुरुवात | 19 / 09 / 2025 सकाळी 10.00 वा. | ई–निविदा सादर करण्याची शेवटची तारीख | 03 / 10 / 2025 दुपारी 3.00 वा. |
| ई–निविदा सादर करण्यासाठीची सुरुवातीची तारीख | 19 / 09 / 2025 सकाळी 10.00 वा. | ई–निविदा उघडण्याचा दिनांक | 04 / 10 / 2025 दुपारी 3.05 वा. (शक्य झाल्यास) |

सूचनेमध्ये खाली नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार ई–निविदा फॉर्म खरेदी / डाउनलोड / बिड भरणे / बिड समाविष्ट करणे / सेवा शुल्क जमा करणे / अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रीया विहीत वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे याची ई–निविदाकारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरित / –
प्रबंधक(प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ, औरंगाबाद.

दिनांक : 18 / 09 / 2025.

## मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील संलग्न व मुख्य इमारत परिसरातील **(Annexe Building & Main Building)** उद्यानांच्या देखभाल, विकास व संगोपन कामाच्या अटी व शर्ती

1. तांत्रिक निवेदेसोबत परिशिष्ट–अ मधील माहिती अचूक भरुन त्यासोबत सदरील कागदपत्रांच्या छायांकित प्रती क्रमवार जोडून तो ऑनलाईन सादर करावा. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर त्या सोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पात्र कंत्राटदारांच्याच आर्थिक निविदा उघडण्यात येतील. आर्थिक निवेदेमध्ये कंत्राटदाराने सदरील कामाचा दोन वर्षांसाठी दर सर्वकर, कामगार व साहित्यासहित नमूद करावयाचा आहे. आर्थिक निविदेमध्ये नमूद केलेला दर हा कंत्राट मिळाल्यापासून दोन वर्षांपर्यंत वैध राहिल.

1(1). निविदा कागदपत्रातील सर्व सूचना, फॉर्म, अटी आणि शर्तींचे परीक्षण आणि अभ्यास निविदादाराकडून अपेक्षित आहे. निविदा कागदपत्रात आवश्यक असलेली संपूर्ण माहिती प्रदान करण्यात अयशस्वी होणे किंवा निविदा कागदपत्रांना कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देणारी निविदा सादर करणे ही निविदादाराच्या जोखमीवर असेल आणि परिणामी त्याची निविदा नाकारली जाईल.

2. **निविदा शुल्क , बयाना ठेव आणि सुरक्षा ठेव**

| निविदा किंमत | बयाना ठेव [E.M.D.] | सुरक्षा ठेव / अनामत रक्कम [Security Deposit] | दोन वर्षांकरिता अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| रु. 27000/– (ना परतावा) | रु.2,70,000/– | स्वीकृत निविदेच्या 5% | 1,51,66,714/– |

2(1). उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक 01/12/2016 च्या शासन निर्णयानुसार सूक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम 2006 अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. त्यासंबंधी वैध प्रमाणपत्र निविदेसोबत दाखल करणे आवश्यक आहे. सदरील प्रमाणपत्र दाखल केले नसेल तर सदरची सूट दिली जाणार नाही आणि निविदा अर्ज फेटाळला जाईल व निविदा बाद करण्यात येईल.

2(2). पात्र/यशस्वी कंत्राटदाराने कंत्राट रकमेच्या 5% एवढी सुरक्षा ठेव [Security Deposit], राष्ट्रीयकृत बॅकेच्या बॅक गॅरंटीद्वारा (an unconditional and irrevocable Performance Bank Guarantee, in favour of Registrar [Admn.], High Court, Aurangabad, as per proforma given at "Annexure "B",) या कार्यालयात कराराच्या दिवशी जमा करावी लागेल.

3. ऑनलाइन बोली सादर करण्यासाठी सूचनाः–

3(1). बोलीदारांना त्यांच्या बोलींच्या सॉफ्ट कॉपी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने महाराष्ट्र सरकारच्या ई–निविदा वेबसाइटवर "तांत्रिक कव्हर" "आर्थिक कव्हर" या दोन कव्हरमध्ये सादर कराव्या लागतील, ज्यामध्ये वैध डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रे वापरली जातील.

3(2). महाराष्ट्र सरकारच्या ई–निविदा वेबसाइटवर ऑनलाइन बोली सादर करण्यासाठी सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in वरुन मिळू शकते.

3(3). बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी निविदेच्या संदर्भात प्रकाशित झालेले सर्व शुध्दिपत्रक विचारात घेऊनच निविदा भरावी.

3(4). तांत्रिक कव्हरमध्ये अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे ही PDF/RAR फॉरमेट मध्ये स्पष्ट, दृष्यमान व शोधण्यायोग्य ( OCR ) असावीत आणि आर्थिक कव्हर (BoQ) .xls फॉरमॅट मध्ये असावे व त्यासोबत आर्थिक कव्हरमध्ये या निविदेतील परिशिष्ट "ड" मधील माहिती अचूकपने भरुन सही शिक्यानिशी PDF फॉरमॅट मध्ये अपलोड करण्यात यावी. सदरील कागदपत्रे mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करावीत. ई–मेलव्दारे किंवा इतर कोणत्याही पध्दतीने पाठवलेली कागदपत्रे तांत्रिक अथवा अर्थिक निविदेसाठी ग्राह्य धरली जाणार नाहीत.

3(5). निविदा दस्तऐवज आणि त्यात समाविष्ट असलेल्या अटी आणि शर्तींशी संबंधित कोणतेही प्रश्न (Question) "प्रबंधक (प्रशासन)" यांना hcaur.mah@nic.in या ईमेल आयडीवर आणि निविदा दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे 0240–2993303 / Ext. = 223 या दूरध्वनी क्रमांकावर विचारावेत.

3(6). ऑनलाइन बोली सादर करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित कोणतेही प्रश्न किंवा महाराष्ट्र सरकारच्या ई–निविदा प्रणालीशी संबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी संबंधीत प्रणालीच्या

24 x 7 मदत केंद्रावर संपर्क साधता येईल त्यासाठी संपर्क क्रमांक 0120–4001 002/0120 – 4001 005/0120 – 4493395 आहेत.

4. पात्रता निकषः–

4(1). **अनुभव प्रमाणपत्रः–** निविदाकाराला शासकीय, निमशासकीय सार्वजनिक अथवा खाजगी क्षेत्रात उद्यान विकास संगोपन (Upkeep, Maintenance and Development of Garden) संदर्भात समाधानकारक व यशस्वी काम केल्याबाबत तीन वर्षांचा अनुभव असणे बंधन कारक आहे. त्या अनुषंगाने संबंधित कार्यालयाचा अनुभव दाखला हा कामाचा कालावधी व किंमतीसह अपलोड करण्यात यावा. सदरील अनुभवापैकी किमान एका कामाची किंमत 50 लाख किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. उपरोक्त अनुभवा व्यतिरिक्त उद्यानकामाशी संबंधित नसलेला इतर कुठलाही अनुभव दाखला अपलोड करण्यात येउ नये तसेच फक्त मनुष्यबळ पुरवठयाचा अनुभव दाखला ग्राहय धरला जाणार नाही.

4(2). **आर्थिक क्षमताः–** निविदादाराची मागिल तीन आर्थिक वर्षांची (2021–2022, 2022–2023, 2023–2024) एकूण उलाढाल किमान रु. 1,50,000,00/– (रु. एक कोटी पन्नास लक्ष) पेक्षा कमी नसावी. सोबत चार्टर्ड अकाउंटंटचे उलाढाल प्रमाणपत्र आणि ऑडीटेड बॅलन्स–शीट जोडणे आवश्यक आहे.

4(3). निविदाकाराने निविदेत नमूद असलेल्या उद्यांनांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणे बंधनकारक आहे. पाहणी केल्याबाबत स्थळ पाहणी प्रमाणपत्र न्यायालयरक्षक विभागाकडून प्राप्त करुन ती तांत्रिक लिफाप्या सोबत अपलोड करणे बंधनकारक आहे. असे स्थळ–पाहणी प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड केले नसल्यास सदरील निविदाकाराची निविदा बाद करण्यात येईल. सदरील उद्यानांची पहाणी करायची असल्यास दि.20/09/2025 ते 03/10/2025 (सोमवार ते शुक्रवार) व 10.00 ते 03.00 या कार्यालयीन वेळेत कंत्राटदारांना करता येईल त्यासाठी या कार्यालयातील राजशिष्टाचार/न्यायालय रक्षक शाखेतील संबंधित अधिकारी/कर्मचा–यांशी संपर्क साधावा.

4(4). निविदाकाराने रु. 500/– किंमतीच्या गैर न्यायिक स्टॅम्प पेपरवरील, योग्यरित्या सही व शिक्का केलेले आणि नोटरीकृत, विहित हमीपत्र आणि घोषणापत्र **(परिशिष्ट क)** तांत्रिक निविदेत अपलोड करावे. साध्या कागदावरील हमी पत्र किंवा गैर न्यायिक स्टॅम्प पेपर ऐवजी फक्त GRAS चालान अपलोड करणे विचारात घेतले जाणार नाही आणि अशा निविदेला प्रतिसाद न देणारे मानले जाईल आणि सदरील निविदा बाद करण्यात येईल.

4(5). कंत्राटदाराने निविदा अर्ज सादर करतांना **परिशिष्ट अ** मध्ये दिलेल्या कागदपत्रांच्या यादीनुसार अनुक्रमे कागदपत्रे निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.

निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास तसेच **परिशिष्ट अ मधील माहिती** अपूर्णं भरल्यास अथवा त्यावर सही व शिक्का नसल्यास, निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

5. यशस्वी निविदाकाराची निविदा स्विकृती झाल्यानंतर या कार्यालयाबरोबर या कार्यालयाने ठरवलेल्या बागकामाच्या सर्व अटी मान्य असणारा नोंदणीकृत करार करावा लागेल तसेच तो करार हा कंत्राटदारावर बंधनकाराक राहील व त्यासाठी येणा–या सर्व खर्चाची जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

6. कंत्राटदाराने बागकामासाठी नेमलेल्या कामगारांना (माळी व मजदुर) किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगाराला देय आलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम व कामगार कायद्यातील इतर तरतूदीनुसार देय रक्कमा यापेक्षा कमी नमूद केली असल्यास, अशा कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येणार नाही. कायदयानुसार पगार व इतर सुविधा देण्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील त्यासंबंधी हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही व यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र कंत्राटदाराने त्याच्या लेटरहेडवर दरमहा देयकासोबत जोडणे अनिवार्य आहे. शासन निर्णय क्र दि. 27 जानेवारी, 2015 नुसार सदरील कामगारांना अदा करावयाची रक्कम कामगार कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी नमूद असल्यास सदरील निविदेकाराची निविदा बाद करण्यात येईल.

6(1). **येथे असे स्पष्टपणे नमूद करण्यात येते की, कंत्राटदाराने निविदा भरतांना निविदेतील परिशिष्ट–ड मधील माहिती शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांनुसार व्यवस्थित भरुन आर्थिक निविदेसोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. निविदेतील तसेच सदरील माहिती शासकीय नियमानुसार योग्यपणे भरली नसल्यास किंवा सदरील परिशिष्ट–ड आर्थिक निविदेसोबत दिलेल्या फोल्डरमध्ये अपलोड केले नसल्यास तसेच BOQ व परिशिष्ट–ड मधील एकूण किंमतीत तफावत आढळून आल्यास सदरील कंत्राटदाराची निविदा निविदाप्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.**

7. कंत्राटदाराने निविदेत नमुद केलेले दर हे मटेरियल खर्च, लेबर चार्जेस, शासकीय कर जसे जीएसटी, व्यावसायिक कर व इतर सर्व खर्च व बागकामासाठी लागणा–या इतर सर्व साहित्याच्या खर्चांसहित असावेत. **येथे असे स्पष्टपणे नमूद करण्यात येते की, आर्थिक निविदा भरतांना सदरील काम विनातक्रार सुरळितपणे होण्यासाठी कामासाठी आवश्यक 05 माळी आणि 17 मजदूर यांना देय असलेले अद्‌यावत किमान वेतन कायदयानुसार देय असणारे वेतन व इतर सुविधा / भत्ते इ. समावेश करुनच निविदा भरण्यात यावी.**

8. कंत्राटदारास देण्यात येणारे काम हे उद्यानाच्या विकास, देखभाल संगोपनाचे आहे. या कामासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ पूर्णवेळ उपलब्ध करणे व त्यांच्याकडून काम करवून घेणे, त्यावर देखरेख नियंत्रण ठेवणे, बागकामासांठी लागणा–या साहित्याचा पुरवठा करणे इ. सर्व बाबींचा समावेश होतो. कंत्राटदारास देण्यात आलेले काम हे विशिष्ट कालावधीसाठी कंत्राटदाराबरोबर करण्यात आलेला करार असून हा कामगारांचा करार नाही. कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणा–या कामगारांच्या कोणत्याही तक्रारीबाबत/सेवेबाबत कुठल्याही प्रकारचा हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही. वरील बाबतीत उच्च न्यायालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.

9. कंत्राटदारास दिलेल्या कार्यादेशानुसार कंत्राटदार काम करण्यास असमर्थ ठरला अथवा या कार्यालयाबरोबर केलेल्या कराराचा भंग केल्यास किंवा स्वखुशीने काम सोडल्यास उद्यान देखभालीचे काम या कार्यालयातर्फे त्वरीत दुस–या कंत्राटदारास देण्याचा अधिकार उच्च न्यायालय प्रशासनाने स्वतःकडे राखून ठेवलेला असून सदरील कंत्राटदाराची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.

10. एखादा बागकामगार समाधानकारक काम करत नसेल अथवा एखाद्‌या बागकामगाराचे अशोभनीय गैरवर्तन आढळल्यास त्या कामगाराला ताबडतोब बडतर्फ करुन त्याऐवजी बदली कामगाराची त्वरित व्यवस्था कंत्राटदाराला करावी लागेल.

11. निविदेत कंत्राटदाराने सादर केलेले दर, हेच दर संपूर्ण कराराच्या कालावधीसाठी अंमलात राहतील. कोणत्याही प्रकारची भाव वाढ झाल्यास किंवा किमान वेतन कायद्‌यानुसार किमान

वेतनात वाढ झाल्यास कराराच्या कालावधीत वाढीव दर दिले जाणार नाहीत. त्यामुळे या गोष्टींचा विचार करुनच निविदा भरावी.

12. कंत्राटदाराचा कराराचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराने निविदेत सादर केलेल्या दराने व त्यात नमूद कलेल्या अटी व शर्तीनुसार पुढील वाढीव कालावधीसाठी उद्यानाचे संगोपन व संवर्धन इ. काम कंत्राटदारास देण्याचा अधिकार उच्च न्यायालय प्रशासनाने राखून ठेवला आहे ही अट सदरील कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदारास दिलेला कराराचा कालावधी कमी करण्याचा, काम समाधानकारक न आढळल्यास करार रद्द करुन दुस–यास काम देण्याचा अधिकारही या कार्यालयाने स्वतःकडे राखून ठेवला आहे.

13. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या वेतनाच्या/इतर भत्त्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत किंवा ई.सी.एस. द्वारे /एन.ई.एफ.टी. व्दारे बॅंक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बॅंक अधिका–यांच्या सहीचे विवरणपत्र (Statement) आणि कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक वैधानिक कपातीसह (ज्यावर संबंधित कंत्राटी कामगाराचे धनादेश क्रमांक/ई.सी.एस.क्रमांक/एन.ई.एफ.टी.क्रमांक लिहिलेला असेल), तसेच ज्या महिन्याचे देयक आहे त्याच महिन्याचे ई.एस.आय.सी. व भविष्यनिर्वाहनिधी भरणा चालान दरमहा कोर्टरक्षक/राजशिष्टाचार विभागात मासिक देयकासोबत सादर करावे लागेल. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदरपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही. सदरील देयक या कार्यालयातील राजशिष्टाचार शाखेतील जबाबदार अधिकारी/समाधानकारक काम केल्याचा अहवाल दिल्यानंतरच स्वीकारले जाईल.

14. कंत्राटदाराने त्यांच्या कामगारांना/कर्मचा–यांना महाराष्ट्र शासन किंवा इतर संबंधित प्राधिकृत शासनाने अधिसूचित केलेल्या किमान वेतन कायद्यानुसार, वेळोवेळी निच्श्ति करण्यात येणारे किमान वेतन, महागाई भत्ता आणि अन्य लागू भत्ते अदा करणे बंधनकारक राहील. किमान वेतन दरामध्ये संबंधित शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणारी कोणतीही वाढ (Increment) कंत्राटदारास अंमलात आणावी लागेल, आणि ती वाढ कर्मचा–यांच्या वेतनात कंत्राटदाराने लागू करावी. अशा वाढीचा कोणताही अतिरिक्त खर्च

कंत्राटदारास वहन करावा लागेल. आणि त्यासाठी प्रबंधक (प्रशासन) खंडपीठ औरंगाबादकडून स्वतंत्रपणे कोणतीही भरपाई देण्यात येणार नाही.

15. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना, कामाचे वेतन व त्यानुषंगिक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता, संबंधित कंत्राटी कामगाराच्या नावाने "Account Payee Cross Cheque" द्वारे(रेखांकित धनादेशाद्वारे) अदा करावेत किंवा ई.सी.एस.द्वारे त्यांच्या बॅक खात्यात जमा करावेत.

16. सदर कामाकरिता कंत्राटदार यांना देय मोबदला हा शासकीय नियमानुसार सर्व कर कपात करुन एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. कांही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव अथवा सदरील लेखाशिर्षांतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे मोबदला देण्यास विलंब झाला तरी कामावर असलेल्या कामगारांचा पगार दरमहा नियमितपणे देण्याबाबत सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत सदर रकमेवर कुठलेही व्याज देय असणार नाही तसेच देण्यात येणारा मोबदल्यावर कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार यांच्यावर राहील.

17. कंत्राटदाराला महिन्याचे देयक अदा करताना, त्या महिन्यात कंत्राटदाराने नेमलेले कामगार, जितके दिवस अनुपस्थित होते (साप्ताहिक सुट्टी वगळून) व त्यांच्या ऐवजी कंत्राटदाराने बदली कामगार उपलब्ध करुन दिलेले नव्हते, तितक्या दिवसांचे वेतन कंत्राटदाराच्या देयकातून कापून घेण्यात येईल व त्या महिन्यातील उर्वरित सर्व दिवसांचे देयक कंत्राटदारास अदा करण्यात यईल.

18. निविदाधारकाने प्रसिध्द केलेल्या नियम व अटी मान्य असल्याबाबतचे साक्षांकित करणे गरजेचे आहे तसेच कार्यालयासोबत कार्यालयाने ठरवलेल्या नियमांनुसार नोंदणीकृत लेखी करार करावा लागेल. तसेच निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रीयेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम (ईएमडी) रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित संस्थेला काळया यादीत टाकण्यात येईल.

19. वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त वेळोवेळी देण्यात येणा–या सूचना तसेच कंत्राटदारास लागू असणा–या या कार्यालयाच्या सर्व साधारण अटी व शर्तींचे पालन करावे लागेल तसेच तो उपलब्ध करुन देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासनाने वेळोवेळी प्रस्तुत केलेले शासन निर्णय/ज्ञापन/परिपत्रके यांचे पालन करावे लागेल. पात्र ठरलेली निविदा मंजूरी प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल. शासनाने मान्यता दिल्या नंतरच कार्यादेश दिला जाईल.

20. कंत्राटदाराकडे असलेले विविध परवान्यांचा कालावधी हा करार कालावधीत अस्तित्वात असला पाहिजे.

21. उद्यानात लावण्यात येणारी झाडे परिसराचे सौंदर्य वाढविणारी व निरोगी असावी.

22. उद्यानातील हिरवळ, शोभीवंत झाडे, फुल झाडे व मोसमी फुलांची वेळच्या वेळी व योग्य देखभाल व जोपासना करण्यात यावी तसेच जेथे जेथे आवश्यकता असेल तेथे हिरवळ (नवीन) टाकावी लागेल.

23. कंत्राटदाराने त्यांच्या ताब्यातील असलेल्या उद्यानाचा संपूर्ण परिसर व प्रवेशद्वाराजवळील परिसर स्वच्छ ठेवावा. त्यात कोणत्याही प्रकारचा कचरा, वाळलेल्या झाडांची पाने, तोडलेल्या झाडांच्या फांदया टाकू नये व साचू देउ नये.

24. हिरवळीची वेळच्या वेळी छाटणी तसेच उद्यानातील किना–याच्या झाडांची योग्य प्रकारे योग्य वेळी छाटणी करुन झाडांना पाणी राहील अशा प्रकारे झाडांना आळे करण्यात यावेत.

25. उद्यानासाठी वेळोवेळी लागणारी माती, शेणखत अथवा उद्यानाच्या विकास व देखभालीसाठी लागणारे सर्व साहित्य हे कंत्राटदाराने स्वखर्चाने आणायचे आहे. तसेच उपरोक्त कामासाठी उच्च न्यायालयातील कार्यरत माळी यांना वरील साहित्य लागल्यास ती पुरवण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

26. उद्यानातील कोणत्याही प्रकारची झाडे, हिरवळ अथवा किनार ही खराब होणार नाही, जास्त पाण्यामुळे पाण्याचा निचरा न होवून खराब होणार नाही तसेच कमी पाण्यामुळे ते वाळून जाणार नाही याची दक्षता कंत्राटदाराला घेणे आवश्यक आहे.

27. उद्यानात पावसाचे पाणी साचल्यास ते त्वरीत उद्यानाबाहेर काढण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

28. उद्यानात वेळच्यावेळी खुरपणी करणे, झाडांची योग्य प्रकारे छाटणी करणे, नवीन झाडाची लागवड करणे, मृत झाडांच्या ठिकाणी नवीन झाडांची लागवड करणे अशा प्रकारची कामे उद्यानात करुन एकसूत्रीपणा आणून उद्यान व परीसर सुंदर व आकर्षक ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

29. उद्यानासाठी आवश्यक लागणारे साहित्य व यंत्रसामुग्री पाईप, झाडांची वेगवेगळया वाहतुक करणे यासाठी कंत्राटदाराला स्वतः व्यवस्था करावी लागेल.

30. कामगारांच्या निष्काळजीपणामुळे जर पाणी वाया जात आहे असे आढळून आले तर प्रत्येक प्रसंगी रुपये एकहजार असा दंड आकारण्यात येईल व अशा दंडाच्या रक्कमेची वसूली त्या महिन्याच्या/अथवा भविष्यकालीन बिलातून वसूल करण्यात येईल.

31. उद्यानातील झाडे अथवा हिरवळीची योग्य प्रकारे देखभाल होत नसल्याचे आढळून आल्यास किंवा कंत्राटदाराच्या दुर्लक्षामुळे उद्यान्ाचे नुकसान होत असल्याचे आढळून आल्यास झालेल्या नुकसानीची या कार्यालयाने ठरवलेली रक्कम त्या महिन्याच्या अथवा भविष्यकालीन बिलातून वसूल केली जाईल.

32. सर्व तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदा त्यांच्या आर्थिक बोली/प्रस्तावांवर विचार करण्यास पात्र असतील. फक्त तांत्रिक दृष्ट्या पात्र निविदाधारकांची आर्थिक बोली उघडल्या जातील. सर्वात कमी बोलीदार, जो की निविदेतील सर्व अटीशर्तीचे पालन करण्यास पात्र असेल (किमान वेतन नियमासह) निश्चित करण्यासाठी आर्थिक प्रस्तावाचे मूल्यांकन केले जाईल. जर दोन किंवा अधिक तांत्रिकदृष्ट्या पात्र बोलीदारांचे मूल्यांकन केलेले आर्थिक प्रस्ताव

समान आणि सर्वात कमी (म्हणजेच L-1) असतील, तेव्हा तांत्रिकदृष्ट्या अधिक योग्य असलेल्या बोलीला निविदा दिली जाईल.

33. उद्यानाच्या देखभाल, संगोपन व संवर्धन कालावधीत झाडांची अपेक्षित वाढ होणे गरजेचे आहे. यासाठी उद्यानातील कांही झाडांची प्रतिनिधीक स्वरुपात सांख्यीकी वाढ नमुन्या दाखल तपासण्यात येईल.

34. सहा. संचालक, उद्यान व उपवने, छत्रपती संभाजीनगर आणि या कार्यालयाच्या न्यायालय–रक्षक शाखेतील अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यानाचे काम करण्यात यावे. न्यायालय–रक्षक तसेच प्रबंधकाचे ताब्यात एक सूचना पुस्तिका कंत्राटदाराने ठेवावी. या सूचनापुस्तिकेत मा. न्यायधिशांनी व वरील अधिका–यांनी दिलेल्या विशेष सूचना व कामासंबधीत निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे कंत्राटदारावर बंधन कारक राहील. संबधित सूचनांची तसेच वेळोवेळी दिलेल्या तोंडी सूचनांची अंमलबजावणी केल्याबाबत सविस्तर अहवाल कंत्राटदाराने सूचना दिल्यापासून 15 दिवसांच्या आत प्रबंधकाकडे सादर करावा व सदरील सूचनांची कार्यवाही पूर्ण झाल्याची नोंद सूचना पुस्तीकेत करावी.

35. बगीचा मशागती दरम्यान उद्यानाच्या बांधीव संरक्षक भिंतीचे अथवा तारेचे कुंपण यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

36. झाडांच्या देखभालीअंतर्गत कापण्यात येणा–या अतिरिक्त फांद्यांची माळ्यामार्फत छाटणी करुन उद्यानातीलच एका वाफ्यात ही कटींग लावण्यात यावी तसेच उद्यानात तयार झालेल्या मोसमी फुलांपासून नवीन रोपटी तयार करण्याची जबाबदारी आपणावर सोपविण्यात येत आहे यासाठी आवश्यक उदा. पॉलिथीन बॅगा ( शासकिय नियमानुसार मान्य असलेल्या) इ. साहित्य कंत्राटदारास स्वतः आणावे लागेल.

37. उद्यानातील कोणत्याही प्रकारचे साहित्य, झाडे, कुंडी, हिरवळ ही या कार्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय उद्यानाबाहेर नेता येणार नाही व नेलेल्या साहित्याची नोंद उद्यानात असलेल्या रजिस्टर मध्ये राखीव पानांवर घ्यावी लागेल व साहित्य परत आल्याची नोंदही

त्याच ठिकाणी घ्यावी लागेल. नेलेले साहित्य जे परत आणणे आवश्यक आहे ते परत आणण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

38. या कार्यालयातर्फे कंत्राटदारास वेळोवेळी लेखी व तोडी सूचना दिल्या जातील. या सूचना जाणून घेण्यासाठी तसेच दिलेल्या सूचनांची पूर्तता केल्याची माहिती देण्यासाठी पंधरा दिवसातून एकदा नोंदवही पुस्तिके सोबत कंत्राटदाराने स्वतः प्रबंधकाचे कार्यालयात येवून उद्यानाचा अहवाल सादर करावा. यासाठी कोणताही प्रतिनिधी अथवा माळी पाठवू नये.

39. या करार कालावधीत उद्यानात कोणत्याही प्रकारची दुर्घटना अथवा कामगारांना होणारी दुखापत किंवा कोणत्याही जीवित व वित्त हानीस उच्च न्यायालय प्रशासन जबाबदार राहणार नाही व अशा घटनेची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच या कार्यालयाचे अथवा सार्वजनिक मालमत्तेचे / उद्यानांचे नुकसान होणार नाही याचीही दक्षता कंत्राटदारास घ्यावी लागेल. असे नुकसान झाल्याचे आढळून आल्यास कार्यालयाने ठरवलेली दंडाची रक्कम सदरील कंत्राटदाराकडून वसूल केली जाईल.

40. कंत्राटदाराकडे उद्यानकामासाठी लागणारे उद्यान साहित्य उदा. लॉन मोअर, खुरपी, कैची, घमेले, फावडे, टिकाव झाडू उद्यानातील कचरा वाहून नेण्याची छोटी टॉली, पाणी पुरवठयासाठी पाईप, फवारणी पंप व इतर यंत्र सामूग्री इ. पुरेशा प्रमाणात व सुस्थितीत उपलब्ध असणे ही कंत्राटदाराची जबाबदारी असेल.

41. उद्यानात काम करीत असतांना कामगारांना सुरक्षिततेच्या नियमांची माहिती देणे आवश्यक आहे तसेच उद्यानात काम करतांना कोणत्या प्रकारची सावधानता बाळगावी याबाबत कंत्राटदारामार्फत कामगारांना पूर्व सूचना देण्यात याव्यात उदा.– विद्युत उपकरणांचा वापर, औषध फवारणीच्या वेळी घ्यावयाची काळजी, किटक व प्राणीदंश, अती उच्चदाबाच्या विद्युत वाहिन्यांखाली वावरतांना घ्यावयाची काळजी तसेच लॉन मोअर व धारदार उद्यान साहित्याचा वापर करतांना घ्यावयाची काळजी इ., तसेच उद्यानात काम करीत असतांना अपघाताची घटना घडल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

42. कंत्राटदाराने निविदेतील अटी व शर्तीचा भंग केला किंवा उद्यानाचे विकास, संरक्षण, संगोपन व देखभालीचे काम समाधानकारक नसेल तर करार पंधरा दिवसांची पूर्व सूचना देउन रद्द करण्यात येईल व कंटात्रदाराची सुरक्षाठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

43. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगाराकडून सरकारी मालमत्तेचे अथवा बागेचे/झाडांचे कुठल्याही प्रकारे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा—या मोबदल्यामधून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

44. उद्यानाला लागणा—या पाणीपुरवठयाची सोय या कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी कार्यालयाची बोअरवेल आहे त्यातून पाणी वापरण्याची परवानगी देण्यात येईल.

45. उद्यानाचे प्रवेशद्वार आकर्षक ठेवण्याच्या दृष्टीने कंत्राटदाराने योग्य ती उपाययोजना करावी. या कार्यालयातर्फे योग्य ती मदत करण्यात येईल.

46. उद्यानात कोणत्याही प्रकारचे कायमस्वरुपी बांधकाम मा. प्रबंधकाचे संमती शिवाय कंत्राटदाराने करु नये.

47. उद्यानात वेळोवेळी देण्यात येणा—या रासायनिक खताचा विचार करता वर्षातून एकदातरी उद्यानातील मातीचे परिक्षण करुन घेणे आवश्यक आहे. यासाठी मातीचा नमूना घेणे व तो प्रयोग शाळेत पोहचवून त्याचा अहवाल आणण्याची जबाबदारी कंत्राटदारावर सोपविण्यात येत असून माती तपासण्यासाठी येणारा खर्च हा सदरील कंत्राटदाराला करावा लागेल. मात्र हे परिक्षण शासकीयंत्रणेमार्फत अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्रयोगशाळेमार्फत करण्यात यावे.

48. उद्यानात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होवू देवू नये, राजकीय पक्षांच झेंडे, बॅनर, कंत्राटदाराची पाटी उभारण्यात येवू नयेत.

49. विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने या कार्यालयाने दिलेल्या सूचनेप्रमाणे वेगवेगळया फुलझाडांची व शोभीवंत झाडांची आकर्षक सजावटीची जबाबदारी सदरील कंत्राटदाराची राहील त्यासाठी कुठल्याही वेगळा मोबदला देय राहणार नाही. उद्यानात विशेष कायक्रमाच्या निमित्ताने अति

महत्वाच्या व्यक्तींद्वारे लावण्यात आलेल्या वृक्षांची विशेष काळजी घेण्यात यावी. व त्याची योग्य ती निगा राखावी व अशा झाडांना या कार्यालयातर्फे पुरवण्यात येणारे फलक लावण्यात यावेत.

50. या कार्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय चित्रीकरण व फोटो काढण्यास परवानगी देवू नये.

51. निवडणुकीच्या काळात उद्यान परिसरात आदर्श आचारसंहीतेचे पालन करावे.

52. उद्यान काम करण्या–या कर्मचा–यांसाठी फर्स्ट एड बॉक्स (प्रथमोपचार पेटी) ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

53. उद्यान काम करण्या–या कर्मचा–यांसाठी युनिफॉर्म तसेच ओळखपत्र पुरविण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील. उच्च न्यायालय प्रशासन कंत्राटदाराच्या कर्मचा–यांना कोणतेही ओळखपत्र देणार नाही. तसेच सदरील ओळखपत्रावर उच्च न्यायालयाचे कुठेही नामनिर्देशन नसावे. तथापि, कंत्राटदाराव्दारे जारी करण्यात आलेले ओळखपत्र संबंधित उच्च न्यायालय अधिकारी किंवा अधिकृत सुरक्षा यंत्रणा यांचेमार्फत गेट पास म्हणून अधिप्रमाणित केले जाउ शकते.

54. कंत्राटदाराच्या सर्व कर्मचा–यांना उच्च न्यायालय परिसरात कुठल्याही प्रकारचा नशा करण्याची तसेच धूम्रपान, तंबाखू, पान इ. खाण्याची सक्त मनाई करण्यात यावी, तसे करतांना एखादा कर्मचारी आढळून आल्यास योग्य तो दंड/कारवाई करण्यात येईल.

55. तातडीचे प्रसंगी या कार्यालयाने दिलेल्या सूचनांनुसार परिसरातील बागकाम करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

56. सर्व बागकाम करणारे कर्मचारी शासनाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोविड अथवा तत्सम इतर आजारांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करतील.

57. उच्च न्यायालय परिसर देखभाल दुरुस्ती सुशोभिकरण समितीच्या बैठकीत उपस्थित राहून वेळोवेळी झालेल्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक असेल.

58. सुट्टीच्या दिवशी जसे की शनिवार, रविवार इ., कंत्राटदाराने मुबलक कर्मचारी बागकामासाठी ठेवावेत जेणेकरुन मा. न्यायमूर्तींची गैरसोय होणार नाही.

59. दैनंदिन साफसफाईमधून तयार झालेल्या कच–याचे वर्गीकरण (ओला व सुका) करुन तो कचरा कार्यालयाने नेमून दिलेल्या ठिकाणीच टाकण्यात यावा तसेच वर्गीकरण केलेल्या कच–यासाठी मुबलक कचरापेटीची (डस्टबीनची) व्यवस्था कंत्राटदारानेच करावी.

60. कंत्राटदाराने साफसफाईसाठी नियुक्त केलेल्या कर्मचा–यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसावा तसेच या बाबतचा पोलिस अहवाल [Verification] या कार्यालयातील प्रशासन विभागात कंत्राटाचे काम सुरु करण्यापूर्वी सादर करावा लागेल. तसेच त्यांच्या वतीने नेमण्यात येणा–या कंत्राटी कामगारांची नावे, त्यांचा पत्ता, फोटो, त्यांची चारित्र्यविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करावे लागतील. तसेच ज्या व्यक्तींची पडताळणी झाली आहे व उपरोक्त कागदपत्रे दाखल केलेली आहेत अशाच व्यक्तींना उपरोक्त कामासाठी कंत्राटकालावधीत काम करावे लागेल. जर एखादा कामगार सुट्टीवर असेल तर दुसरा बदली कामगार ज्याने उपरोक्त बाबींचे पालन केले आहे त्यालाच कोर्टरक्षक विभागास तशी सूचना दिल्यानंतरच कामासाठी पाठवता येईल. सदरील बाबींच्या पालनात कुठलीही हलगर्जी अढळल्यास, कामगारांकडून अनुचित आचरण आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील व नियमांनुसार कठोर कार्यवाही करण्यात येईल.

61. एक अथवा अधिक निविदा स्वीकारणे/नाकारण्याचे तसेच काम विभागून देण्याचे किंवा कामाचा अनुभव, गुणवत्ता व सध्या करीत असलेले काम यांचा विचार करुन निविदा देण्याबाबतचे सर्व अधिकार प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. विशेष अटी व शर्ती असलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

62. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद हे या निविदेसंदर्भातील सर्वाधिकार राखून ठेवत आहे. वरील अटी व शर्तींमध्ये कुठल्याही प्रकारचा बदल, सुधार/दुरुस्ती करणे तसेच कुठलेही कारण न देता व कार्यालयाचे हित लक्षात घेता

निविदा पात्र किंवा अपात्र ठरवण्याचे तसेच कोणत्याही टप्यावर निविदा प्रक्रीया रद्द करण्यासंबंधीचे सर्वाधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

63. वाद निवारण (Arbitration) :– उच्च न्यायालय प्रशासन आणि सेवा पुरवठादार यांच्यात झालेल्या कराराशी संबंधित किंवा त्यातून निर्माण होणारा कोणताही दावा, वाद वा मतभेद, उच्च न्यायालय प्रशासनाव्दारे नियुक्त करण्यात येणा–या एकमेव मध्यस्थाकडे सोपविण्यात येईल. ही मध्यस्थी प्रक्रिया मध्यस्थी आणि सलोखा अधिनियम, 1956 (त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा–या सुधारणा सहित) अन्वये पार पाडली जाईल. मध्यस्थीची कार्यवाही इंग्रजी भाषेत व छत्रपती संभाजीनगर येथे पार पडेल. मध्यस्थीचा निर्णय अंतिम असून, तो दोन्ही पक्षांस बंधनकारक राहील.तथापि, सेवा पुरवठादारास स्वतःच्या कर्मचा–यांशी संबंधित सेवाशर्तीबाबत कोणत्याही प्राधिकरणासमोर जसे की कामगार आयुक्त, कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, निवृत्ती वेतन अधिनियम, 1972 अंतर्गत प्राधिकृत अधिकारी, समेट अधिकारी अथवा इतर कोणतेही न्यायिक प्राधिकरण उपस्थित होणा–या कोणत्याही वादाचे निराकरण करण्याची संपूर्ण जबाबदारी राहील.

64. उद्यानाच्या बाबतीत कोणताही वाद उपस्थित झाल्यास तो औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेअंतर्गत राहील.

स्वाक्षरित / –
प्रबंधक(प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ, औरंगाबाद.

दिनांक : 18 / 09 / 2025.

परिशिष्ट–अ

# मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद

## येथील मुख्य व संलग्न इमारत (Main & Annexe Building) कार्यालय परिसरातील उद्यान कामाच्या निविदेसाठीचा तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावयाचा अर्ज/विवरणपत्र

शासनमान्य/अनुभवी कंत्राटदार/संस्था यांनी भरावयाचा अर्ज.

| | |
|---|---|
| अर्जदार / संस्थेचे नाव | |
| पत्रव्यवहाराचा पत्ता व दुरध्वनी क्र./मोबाईल क्र., ई–मेल आयडी | |

| अ. क्र. | पात्रता निकष | होय/नाही | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | नर्सरीचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र आहे काय? | | |
| 2 | निविदा शुल्क आणि बयाणा ठेव ऑनलाईन जमा केली आहे काय? | | |
| 3 | व्यवसायकर प्रमाणपत्र जोडले आहे काय? | | |
| 4 | आयकर स्थायी खाते क्र. (पॅन) ची छायांकित प्रत जोडली आहे काय? | | |
| 5 | ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र जोडले आहे काय? | | |
| 6 | पी.एफ. प्रमाणपत्र जोडले आहे काय? | | |
| 7 | जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे काय? | | |
| 8 | मागील तीन आर्थिक वर्षाची (उदा. 2021–2022, 2022–2023, 2023–2024) आयकर विवरणपत्रे (Income Tax Returns) जोडले आहे काय? | | |
| 9 | मागिल तीन आर्थिक वर्षांची (2021–2022, 2022–2023, 2023–2024) एकूण उलाढाल किमान रु. 1,50,000,00/– (रु. एक कोटी पन्नास लक्ष) पेक्षा कमी नसावी. सोबत चार्टर्ड अकाउंटंटचे उलाढाल प्रमाणपत्र आणि ऑडीटेड बॅलन्स–शीट जोडले आहे काय? | | |
| 10 | शासकीय, निमशासकीय सार्वजनिक अथवा खाजगी क्षेत्रात उद्यान विकास संगोपन संदर्भात समाधानकारक व यशस्वी काम केल्याबाबत तीन वर्षांचा संबंधित कार्यालयाचा दाखला हा कालावधी व किंमतीसह जोडला आहे काय? त्यापैकी किमान एका कामाची किंमत 50 लाख किंवा त्यापेक्षा अधिक आहे काय? | | |
| 11 | उद्यानासाठी आवश्यक असणा–या यांत्रिकी व उद्यान साहित्याच्या उपलब्धते बाबतचा तपशिल उदा. ट्रॅक्टर, फवारणी पंप, लॉन मुव्हर आदी या व्यतिरीक्त उद्यानात उपयोगात आणत असलेल्या आधुनिक कृषी सामुग्री आहे काय? यादी सोबत जोडणे आवश्यक. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | साईट–व्हिजिट प्रमाणपत्र आहे काय? (ऑनलाइन निविदा सादर करताना या खंडपीठातील न्यायालय–रक्षक या विभागाने दिलेले साईट–व्हिजिट प्रमाणपत्र अपलोउ करावे.) | | |
| 13 | हमी आणि घोषणा पत्र **(परिशिष्ट क)** ( पाचशे रुपयाच्या नॉन ज्युडिशियल बॉड पेपरवर) दिले आहे काय? | | |
| | टीप : या अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. **अर्जासोबत अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे अर्जातील अ.क्र. आणि पृष्ठ क्रमांका नुसारच अपलोड करावी.** | | |

वरील माहिती सत्य असून ती आमच्यावर बंधनकारक आहे. आम्ही निविदेत नमूद असलेल्या उद्यानांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली आहे. आम्ही सदरील अटी व शर्ती पूर्णपणे वाचल्या असून त्या आमच्यावर बंधनकारक राहतील तसेच वरील माहिती सत्य असून अर्जातील माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे असत्य आढळल्यास आमची स्पर्धात्मक निविदा अपात्र ठरेल व या स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून आम्हाला बाद करण्यात येईल याची आम्हाला जाणीव असून याबाबत आम्ही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा विनंती प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे करणार नाही. आम्ही प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, आमची संस्था कुठल्याही शासकीय/निमशासकीय संस्थेच्या काळया यादीत नाही. तसेच आवश्यकता पडेल तेंव्हा मी सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करीन.

नांव : सही व शिक्काः

पत्ता :

**Annexure - B**
**PERFORMANCE SECURITY FORM**

To,
The Registrar (Admn.)
High Court of Judicature at Bombay,
Bench at Aurangabad.

WHEREAS________________________________ (Name of Contractor) has undertaken the Contract, as per Tender No. __________________________ dated, ___________ to provide ________________________________ (Description of goods and Services) hereinafter called "the Contract".

AND WHEREAS it has been stipulated by you in the said Contract that the Tenderer shall furnish you with a Bank Guarantee by a recognized Bank for the sum specified therein as security for compliance with the Tenderer's performance obligations in accordance with the Contract.

AND WHEREAS we have agreed to give the Tenderer a guarantee:-

THEREFORE, WE hereby affirm that we are Guarantors and responsible to you, on behalf of the Tenderer, up to a total of Rs._________________(amount of the guarantee in Words and Figures) and we undertake to pay you, upon your first written demand declaring the Tenderer to be in default under the Contract and without cavil or argument, any sum or sums within the limit of ___________________________ as aforesaid, without your needing to prove or to show the grounds or reasons for your demand or the sum specified therein.

This guarantee is valid until the ________day of _________ 20__.

Signature and
Seal of Guarantors _________________________
_______________________________________
_______________________________________
_______________________________________
Date:- ________________________________
Address:- ______________________________

परिशिष्ट–क

# मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद

# घोषणा व लेखी हमीपत्र

(रु. 500/– च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीकृत)

टेंडर क्रमांक जा.क्र.एन/कॅश/ 2025.

प्रति,
मा. प्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ, औरंगाबाद.
छत्रपती संभाजीनगर.

निविदाधारकाचे नावः–

महोदय,

मी/आम्ही निविदा कागदपत्रात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या माझ्यावर/आम्हावर बंधनकारक असतील. त्यांचे पालन करण्याची मी/आम्ही हमी देतो व प्रतिज्ञा करतो. त्याअनुषंगाने मी खालील प्रमाणे लेखी हमी पत्र सादर करतो.

1. मी/आम्ही मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील मुख्य व ॲनेक्स इमारतींतील सर्व बागांची प्रत्यक्ष पाहणी केली असून, कामाच्या स्वरुपाची पूर्ण माहिती घेतली आहे. सदरील उद्यान कामासाठी लागणारे 05 माळी व 17 मजदूर इतके मनुष्यबळ, पुरेसे साहित्य, यंत्रसामग्री व इतर साहित्य यांची उपलब्धता मी/आम्ही करू.

2. मी/आम्ही EPF, ESIC, GST, व्यवसाय कर आणि इतर संबंधित कायद्यांनुसार सर्व नोंदणी व परवाने घेतलेले आहेत त्याचे नियमानुसार भरणा वेळेवर आम्ही करु.

3. मी/आम्ही मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे बागकामासाठी कार्यरत आमच्या कामगारांना करार कालावधीत शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगाराला देय आलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम व कामगार कायद्यातील इतर तरतूदीनुसार देय रक्कमा यापेक्षा कमी रक्कम अदा करणार नाही व तसे आढळल्यास त्यासाठी मी/आम्ही स्वतः जबाबदारी स्वीकारु व त्यासंबंधी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद जी कांही कायदेशीर कार्यवाही करेल ती आम्हाला मान्य असेल.

4. मी/आम्ही बागकामासाठी केवळ प्रशिक्षित, अनुभवी व बागकामातील पारंगत कर्मचारीच नेमणार आहोत.

5. मी/आम्ही स्पष्टपणे हमी देतो की, सदर निविदा सादर करताना बागकामासाठी आवश्यक असलेले सर्व कायदेशीर परवाने, नोंदण्या आणि मंजुरी (उदा. कंत्राटी मजूर परवाना, मजूर कायदा, EPF, ESIC इ.) आमच्याकडे अस्तित्वात आहेत आणि त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे आम्ही तांत्रिक निविदेसोबत सादर करत आहोत. तसेच, ही सर्व परवाने व मंजुरी करार कालावधीत सदैव

वैध व अद्ययावत (Up-to-date) ठेवण्याची पूर्ण जबाबदारी माझी/आमची राहील. सदर कागदपत्रांपैकी कोणतेही वैधतेच्या बाहेर गेले असल्यास, आम्हाला उत्तरदायी धरले जाईल व त्याचे परिणाम आम्हाला मान्य असतील.

6. मागील पाच वर्षांत माझ्या/आमच्या विरुध्द कोणतीही दिवाळखोरी किंवा दिवाळखोरीसंबंधी प्रक्रिया सुरू नाही किंवा घोषित करण्यात आलेले नाही.

7. कोविड–19 किंवा तत्सम आजारासंबंधी किंवा अन्य कोणत्याही आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन मी/आम्ही काटेकोरपणे करू

8. मला/आम्हाला केंद्र/राज्य शासन, महामंडळे किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थंमार्फत काळ्या यादीत (Blacklisted) टाकण्यात आलेले नाही.

9. माझ्यावर/आमच्यावर कोणतीही श्रम कायद्यांचे उल्लंघन किंवा गुन्हेगारी प्रक्रिया प्रलंबित नाही.

निविदा सादर करणाऱ्याची स्वाक्षरीः——————————————

नावः——————————————————————

पत्ताः——————————————————————

संपर्क क्रमांकः————————————————————

सीलः——————————————————————

| परिशिष्ट ड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दर विश्लेषण अहवाल | | | | | | |
| ( आर्थिक निविदेसोबत सादर करावयाचा आहे ) | | | | | | |
| विभाग अः कुशल कर्मचारी ( प्रति माळी) | | | | विभाग बः अकुशल कर्मचारी (प्रति मजूर) | | |
| अनु. क्र | वर्णन | रक्कम (₹) | | अनु. क्र | वर्णन | रक्कम (₹) |
| 1 | मूळ वेतन | | | 1 | मूळ वेतन | |
| 2 | विशेष भत्ता | | | 2 | विशेष भत्ता | |
| 3 | घरभाडे भत्ता (**H R A**) | | | 3 | घरभाडे भत्ता (**H R A**) | |
| 4 | भविष्य निर्वाह निधी | | | 4 | भविष्य निर्वाह निधी (**EPF**) | |
| 5 | कर्मचारी राज्य विमा | | | 5 | कर्मचारी राज्य विमा (**ESIC**) | |
| 6 | बोनस | | | 6 | बोनस | |
| एकूण ( प्रति माळी ) | | | | एकूण ( प्रति मजूर ) | | |
| एकूण रक्कम **X** माळींची संख्या (5): ₹ | | | | एकूण रक्कम **X** मजूरांची संख्या (17): ₹ | | |
| 5 माळयांचे मासिक वेतनः ₹ | | | | 17 मजूरांचे मासिक वेतनः ₹ | | |
| 5 माळयांचे दोन वर्षांचे वेतन खर्चः ₹ | | | | 17 मजूरांचे दोन वर्षांचे वेतन खर्चः ₹ | | |

| विभाग कः सारांश व अंतिम कोटेशन | |
|---|---|
| तपशील | रक्कम ₹ |
| दोन वर्षांचा एकूण वेतन खर्च ( अ + ब ) | |
| एकूण साहित्य खर्च दोन वर्षांकरिता | |
| एकूण **GST** दोन वर्षांकरिता | |
| एकूण नफा दोन वर्षांकरिता | |
| **BoQ** मध्ये नमूद केलेली /सदरील कामाची एकूण रक्कम | |

टीप:

- सर्व कायदेशीर योगदान (**EPF, ESIC** इत्यादी) सध्याच्या शासकीय नियमांनुसार विचारात घ्या.
- उपरोक्त संबंधित तक्त्यामध्ये कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाने प्रकाशित केलेले परिमंडळ निहाय नवीनतम किमान मूळ वेतन व विशेष भत्त्यासाठी अ.क्र ४८ मधील दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग या मधील परिमंडळ १ मधील दर लागु राहतील.
- **BOQ** व परिशिष्ट–ड मधील कामाच्या एकूण रकमेत तफावत आढळून आल्यास सदरील निविदाकाराची निविदा बाद करण्यात येईल.
- सर्व रक्कम **INR** मध्ये नमून कराव्यात.

नांव : सही व शिक्काः

पत्ता